# उपवनसंरक्षक, पुणे वनविभाग, पुणे यांचे कार्यालय

सेनापती बापट मार्ग, सिम्बायोसिस कॉलेज समोर, पुणे-४११ ००४
दूरभाष क्रमांक : ०२० २५६६ ०५९३ ई-मेल : dycfpune@mahaforest.gov.in

पत्र

विषय:- NHAI PIU- Kolhapur- Development of Economic Corridors, Inter corridors, Feeder routes and Coastal Roads to improve the efficiency of freight movement in India (Lot-1/ Maharashtra/ Package-3 of Bharatmala Pariyojna)- Diversion of 8.6291 Ha. of Forest land for widening of the existing Lonand to Kedgaon Road NH 965D (SH 117, 118 and MDR 67) in Pune and Satara District of Maharashtra **(FP/MH/ROAD/35942/2018)**

जा.क्र.-ब/कक्ष-४-२/जमीन/एफसीए-९६/ 296 /२०१८-१९.
पुणे - ४११ ००४. दिनांक-29/०२/२०१९.

प्रति,

प्रोजेक्ट डायरेक्टर,
राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण,
वसंत राज, ५१०/बी/३६, ई वार्ड,
घाटगे कॉलनी, कदमवाडी रोड,
कोल्हापूर ४१६ ००३.

संदर्भ:- आपलेकडिल पत्र क्र. NHAI/PIU/KOLHAPUR/Bharatmala Pariyojana/2018/974, दि. 10/12/2018. (या कार्यालयास दि. १९/०१/२०१९ रोजी प्राप्त)

उपरोक्त विषयांकित प्रकरणी वरील संदर्भान्वये आपण या कार्यालयास सादर केलेल्या वन (संवर्धन) अधिनियम १९८० अंतर्गतचे प्रस्तावाची पडताळणी केली असता त्यामध्ये खालीलप्रमाणे त्रुटी असल्याचे दिसून येत आहे.

१. आपण सादर केलेल्या प्रस्तावमधील पार्ट-१ मध्ये Employment likely to be generated मध्ये दर्शविलेली माहिती ही Permenant, Temperary, Skilled, Semi Skilled and Unskilled मध्ये दर्शविणे आवश्यक आहे.

२. आपण सादर केलेल्या प्रस्तावामध्ये बाधीत होणा-या वनक्षेत्राचे एरिया स्टेटमेंट विहीत नमुन्यात सादर करणे आवश्यक आहे.

३. आपण सादर केलेल्या प्रस्तावामधील प्रस्तावीत रस्त्याचे तांत्रिक व प्रशासकीय मंजूरीचे अंदाजपत्रक सादर केलेले नाही. प्रकरणी ते समाविष्ठ करणे आवश्यक आहे.

४. प्रस्तावीत क्षेत्राबाबत जिल्हाधिकारी यांचेकडिल विहीत नमुन्यातील FRA २००६ बाबतचे प्रमाणपत्र सादर केलेले नाही. प्रकरणी ते समाविष्ठ करणे आवश्यक आहे.

५. आपण सादर केलेल्या प्रस्तावामध्ये सादर केलेला संरक्षित क्षेत्रापासून प्रस्तावीत क्षेत्र किती अंतरावर आहे याबाबतचा नकाशा चुकीचा जोडलेला आहे. प्रस्तावामधील नकाशे हे केंद्र शासनाचे पत्र क्र. फ-११-९/९८-एफसी, दि. ०८/०७/२०११ मधील मार्गदर्शक सुचनांचा अवलंब करण्यांत यावा व त्याप्रमाणे दुरूस्ती होणे आवश्यक आहे.

६. आपण सादर केलेल्या प्रस्तावामधील प्रमाणपत्र क्र. ६ मध्ये पर्यायी वनीकरणासाठी वळतीकरण होणारे क्षेत्राएवढेच अवनत वनक्षेत्र प्रस्तावीत केलेले आहे. तथापि त्यामध्ये दुप्पट अवनत वनक्षेत्र प्रस्तावीत करून त्याप्रमाणे प्रमाणपत्रामध्ये दुरुस्ती होणे आवश्यक आहे.

७. आपण सादर केलेल्या प्रस्तावामधील आपले कार्यालयाशी व या कार्यालयाशी निगडीत असणा-या प्रमाणपत्रामध्ये सातारा, पुणे व भोर वनविभागातील गावाची नावे टाकून एकत्रितपणे प्रस्ताव सादर केलेला आहे. तथापि पुणे वनविभागाशी निगडीत प्रमाणपत्रे वेगळयाने सादर करणे आवश्यक आहे. तसेच सदर प्रकरणी केंद्र शासनाचे मार्गदर्शक सुचनेनुसार ज्या वनविभागाचे वनक्षेत्र जास्त बाधीत होत आहे तो वनविभाग नोडल अधिकारी होत आहेत. प्रकरणी दुरुस्ती होणे आवश्यक आहे.

८. आपण सादर केलेल्या प्रस्तावामधील पुणे वनविभागाशी निगडीत प्रमाणपत्रावर इतर वनविभागातील वनक्षेत्र बाधीत होत असलेल्या गावाची नावे दर्शविण्यांत आलेली आहेत. तथापि सदर प्रमाणपत्रावर पुणे वनविभागातील वनक्षेत्र बाधीत होत असलेल्या गावाची नावे व क्षेत्र दर्शविणे आवश्यक आहे.

९. आपण सादर केलेल्या प्रस्तावामधील प्रमाणपत्र क्र. २२ वर दर्शविलेले क्षेत्रामध्ये व एकुण क्षेत्रामध्ये तफावत आहे. दुरुस्ती होणे आवश्यक आहे.

Scanned by CamScanner

१०. आपण सादर केलेल्या प्रस्तावामधील प्रमाणपत्र क्र. २३ मध्ये Environment Clearance च्या प्रती जोडल्या आहेत असे नमुद केले आहे तथापि सदरच्या प्रती प्रस्तावासोबत जोडल्याचे दिसून येत नाही.

११. Online प्रणालीमध्ये प्रस्तावीत वनक्षेत्र हे आपण या कार्यालयास सादर केलेल्या हार्ड कॉपीचे प्रस्तावाशी सुसंगत नाही. दुरूस्ती होणे आवश्यक आहे.

१२. आपण सादर केलेल्या प्रस्तावाचे प्रस्तावीत क्षेत्र हे मयुरेश्वर अभयारण्याचे संरक्षित क्षेत्रापासून १० कि.मी. चे आत येत असल्यामुळे सदर प्रस्तावास राष्ट्रीय वन्यजीव मंडळाची (NBWL) मान्यता घेणे आवश्यक आहे.

१३. आपण सादर केलेल्या प्रस्तावामध्ये बाधीत होणा-या वनक्षेत्राचे व खाजगी क्षेत्राचे गट नंबर व त्याचे सर्व्हे नंबर निहाय एरिया स्टेटमेंट सादर करणे आवश्यक आहे.

१४. आपण सादर केलेल्या प्रस्तावातील नकाशावर दर्शविलेले GPS रिडिंगची Google Earth वर पडताळणी केली असता त्यामध्ये तफावत असल्याचे दिसून येत आहे. दुरूस्ती होणे आवश्यक आहे.

उपरोक्त प्रमाणे त्रुटींची पुर्तता करून परिपुर्ण प्रस्ताव या कार्यालयास सादर करवा जेणेकरून त्यावर संस्करण करून केंद्र शासनाचे मान्यतेसाठी वरिष्ठ कार्यालयास सादर करणे सोईचे होईल. सदर प्रकरणी अधिक माहितीसाठी forestclearance.nic.in या वेबसाईटवर शोध घ्यावा.

वरीलप्रमाणे त्रुटींची पुर्तता करून प्रस्ताव ७ प्रतीत तात्काळ या कार्यालयास फेरसादर करावा.

सहपत्र- वरीलप्रमाणे.

(श्रीलक्ष्मी ए.)
उपवनसंरक्षक,
पुणे वनविभाग, पुणे.

प्रत:- १. सहा. वनसंरक्षक (ववसं) / (सांख्यिकी)/ (वकँई), पुणे यांचेकडे वरीलप्रमाणे माहिती व पुढील उचित कार्यवाहीसाठी.

२. वनपरिक्षेत्र अधिकारी- दौड व बारामती यांचेकडे वरीलप्रमाणे माहिती व पुढील उचित कार्यवाहीसाठी.

२/- त्यांना कळविण्यांत येते की, वरील बाधीत होणा-या वनक्षेत्रातील वृक्षांची मोजदाद, तसेच वृक्षतोडीचे अंदाजपत्रक व बाधीत होणा-या वनक्षेत्रामध्ये कोणती न्यायालयीन प्रक्रिया चालू आहे किंवा कसे तसेच विहीत नमुन्यातील स्थळपाहणी अहवाल याबाबतची माहिती सादर करण्यांत यावी.

Scanned by CamScanner